जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५२१ दिनांक - १०/१२/२०२४**

गुन्हे शाखा युनिट-३ पुणे शहर

## अग्निशस्त्राच्या गुन्हयांतील पाहिजे आरोपी यांस अटक करुन त्याचेकडुन चोरीची बुलेट व ॲक्टिव्हा अशा मोटार सायकली जप्त करुन दोन वाहन चोरीचे गुन्हे उघड.

दि.०९/१२/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ मधील अधिकारी व स्टाफ असे सिंहगड रोड पोलीस ठाणे हददीत पाहिजे फरारी व तडीपार आरोपीचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार गणेश सुतार व ज्ञानेश्वर चित्ते यांना बातमी मिळाली की, धायरी पुणे येथील श्री कंट्रोल चौक ते अभिनव कॉलेज रोडवर एक इसम बुलेट गाडी घेवुन थांबलेला असुन त्याचेकडे असलेली बुलेट चोरीची आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

मिळालेले बातमीच्या ठिकाणी युनिट ३ कडील सहा.पो.निरी. ढवळे व अंमलदारासह जावुन इसम नामे **अदित्य अतुल माने वय.२२ वर्षे.रा.माने निवास,प्रभात प्रेस जवळ अभिनव कॉलेज पाठीमागे धायरी पुणे** यास बुलेट गाडी सह ताब्यात घेवुन त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याचा मामेभाऊ याने सात ते आठ महिन्यापुर्वी नसरापुर येथुन गाडी चोरलेली असल्याचे सांगितले. त्याबाबत राजगड पोलीस ठाणे येथे खात्री करता राजगड पोलीस ठाणे गु.र.नं ९२/२०२४ कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद असल्याचे आढळुन आलेले असुन सदर आरोपीस पुढील तपासकामी राजगड पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिलेले आहे.

तसेच सिहंगड रोड पोलीस ठाणे गु.र.नं ७२३/२०२४ भारतीय शस्त्र अधि कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधि कलम ३७(१)सह १३५ मधील पाहिजे आरोपी नामे **साहिल सागर शेलार वय.१९वर्षे रा.पानशेत रोड गो-हे खुर्द पुणे** यांस अटक करुन त्याचेकडुन सुमारे १५ दिवसापुर्वी राजगड पोलीस ठाणे गु.र.नं ५५९/२०२४ कलम ३०३(२)भारतीय न्याय संहिता मधील चोरीस गेलेली २५,०००/-रु. किं.ची एक काळे ग्रे रंगाची ॲक्टीव्हा मोपेड जप्त करुन सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे. तसेच आरोपीवर यापुर्वी सिंहगड रोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२४१/२०२४ भा.दं.वि.क.३७९ अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदरची कारवाई ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे श्री शैलेश बलकवडे मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री निखिल पिंगळे मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१,पुणे श्री. गणेश इंगळे,यांचे मार्गदर्शनखाली युनिट ३ गुन्हे चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री.रंगराव पवार सहा.पो.निरी. ज्ञानेश्वर

ढवळे, पोलीस अंमलदार शरद वाकसे, गणेश सुतार, सुजित पवार, संजीव कळंबे, महिला पोलीस अंमलदार सोनम नेवसे, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर चित्ते, प्रतिक मोरे, राकेश टेकावडे, हरिश गायकवाड, इसाक पठाण व यांनी कामगिरी केलेली आहे.

